# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/१०/२०२६ ( रविवार )**

---

## पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :—** दिनांक ०३/१०/२०२६ रोजी फिर्यादी श्री. पुरण रमेश भैसवार, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र ०५, नविन वस्ती व्हिडीओ चौक, बुट्टीबोरी, ता. जि. नागपूर यांनी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे तक्रार दिली की, दिनांक ०३/१०/२०२६ रोजी यातील **आरोपी नामे दिलीप पवार, वय ३५ वर्ष, रा. वडार मोहल्ला, बुट्टीबोरी** याने फिर्यादीचे काकांचे दुकानातुन चप्पल दुरुस्ती करुन त्याचे पैसे न दिल्याने काकांनी पैसे मागितले असता याच कारणावरुन आरोपीने फिर्यादीचे काका (मयत) नामे जयसिंग राजाराम भैसवार, वय ७६ वर्ष, रा. बोरी याचे सोबत भांडण करुन शिवीगाळी करुन दुकानातील लोखंडी त्रिकोणी एरण (मोची कामात वापरण्यात येणारा) ने जिवानीशी ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारुन गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. सदर जखमीचा एम्स हॉस्पीटल नागपूर येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात खुनाचा गुन्हा नोंद करून आरोपीस दिनांक ०३/१०/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०४ गुन्हे दाखल,

**दिनांक ०३/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०४ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे शांन्ताराम मरेप्पाजी गायकवाड, वय ५३ वर्ष, रा. मारोडी ता. मौदा जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी श्याम देवाजी नारनवरे, वय ४५ वर्ष, रा. ढालगाव खैरी, ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे मोहित विजय मेश्राम, वय ३४ वर्ष, रा. ईमामवाडा मागे नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे संजु प्रभाकर वरखडे याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १८०० मिली देशी दारू, १८०० मिली विदेशी दारू असा एकुण २७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक ०३/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या तसेच सट्टापट्टीचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ७९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन अरोली, देवलापार मध्ये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत** आरोपी नामे अर्जुन नथुजी शेंडे, रा. कोदामेढी, ता. मौदा, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याचे त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत** आरोपी नामे १) राजकुमार यादवराव मांढरे, वय ५० वर्ष, २) विलास लखन कोरचे, वय २९ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. पुसदा पुनर्वसन, ता. रामटेक, जि. नागपुर. ३) विनोद बळीराम सिंदराम, वय ३८ वर्ष, रा. चिचदा नवेगांव, ता. रामटेक, जि. नागपुर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने असे एकुण ०३ आरोपींविरूद्ध ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एकुण ०४ आरोपीविरूद्ध एकुण **०२ गुन्हे** नोंद करण्यात आले.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर